**ब्राझीलमधील रिओ दि जानेरो येथे 17व्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांची उरुग्वेच्या राष्ट्राध्यक्षांशी भेट (07 जुलै 2025)**

07 जुलै 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आज ब्राझीलमधील रिओ दि जानेरो येथे ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर उरुग्वेचे राष्ट्राध्यक्ष महामहिम यामांडू ओरसी यांची भेट घेतली.

2. उभय नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांबाबत संपूर्ण विस्ताराने चर्चा केली. त्यांनी डिजिटल सहकार्य, ICT, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि UPI, संरक्षण, रेल्वे, आरोग्य आणि औषधनिर्माण, कृषी, ऊर्जा, संस्कृती आणि परस्पर नागरिकांमधील संबंध या क्षेत्रांतील सहकार्याचा आढावा घेतला. द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणुकीला बळकटी देणे हा चर्चेचा एक महत्त्वाचा विषय होता. उभय बाजूंनी भारत-MERCOSUR प्राधान्य व्यापार कराराच्या विस्तारामध्ये स्वारस्य व्यक्त केले. याचे उद्दिष्ट अधिक आर्थिक क्षमता आणि व्यापार पूरकता यांसाठी मार्ग खुला करणे हे आहे.

3. पहलगाम येथे अलिकडे झालेल्या निर्घृण दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केल्याबद्दल पंतप्रधानांनी राष्ट्राध्यक्ष ओरसी यांचे आभार मानले आणि सर्व प्रकारच्या दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारतासोबत असलेल्या उरुग्वेच्या ऐक्यभावाची प्रशंसा केली.

4. या बैठकीत उभय देशांमध्ये भविष्यवेधी द्विपक्षीय भागीदारी विकसित करण्याच्या वचनबद्धतेला दोन्ही नेत्यांनी दुजोरा दिला.

**रिओ दि जानेरो**

**07 जुलै 2025**